महाराष्ट्र शासन
# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५०९०६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in
४१२-ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.

जावक क्रमांक : तंशिविकापु/विवि/विद्यार्थी संस्था बदल२०२२-२३/२०२२/ 3677 दिनांक : ०१.०८.२०२२

01 AUG 2022

परिपत्रकः

प्रति,
प्राचार्य,
शासकीय, अशासकीय अनुदानित व खाजगी विनाअनुदानित
अभियांत्रिकी व औषधनिर्माणशास्त्र **पदविका संस्था**
पुणे विभाग.

विषय : शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये शासकीय, अशासकीय अनुदानित व खाजगी विनाअनुदानित अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र इ. **पदविका अभ्यासक्रमाच्या** संस्थेतील विद्यार्थ्यांचे पहिल्या वर्षानंतर पाठ्यक्रम बदल, तसेच पहिल्या व दुस-या वर्षानंतर संस्था बदल करण्याबाबत..

संदर्भ : १) मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे परिपत्रक जा.क्र. १०/एडीएम/विद्यार्थी बदली/२०२२/६७१ दिनांक २९.०७.२०२२.
२) मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे पत्र जा.क्र. १०/एडीएम/विद्यार्थी संस्था बदल/२०२२/६७२ दिनांक २९.०७.२०२२.

उपरोक्त विषयास अनुसरुन, या विभागीय कार्यालयाच्या अधिपत्याखालील सर्व शासकीय, अशासकीय अनुदानित व खाजगी विनाअनुदानित अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र इ. पदविका अभ्यासक्रमाच्या संस्थेतील विद्यार्थ्यांचे पहिल्या वर्षानंतर पाठ्यक्रम बदल, तसेच पहिल्या व दुस-या वर्षानंतर संस्था बदल करण्याची कार्यवाही उपरोक्त संदर्भीय परिपत्रक व पत्र यानुसार संस्थास्तरावर, विभागीय स्तरावर व संचालनालय स्तरावर करावयाची आहे.

**यास्तव पाठ्यक्रम व संस्थाबदलास नियमानुसार पात्र असणा-या इच्छुक विद्यार्थ्यांनी संदर्भ क्रमांक १ चे परिपत्रकामध्ये परिच्छेद क्रमांक १ मधील 'क' ते 'ज' मध्ये नमुद केलेल्या कागदपत्रांच्या छायाप्रतींसह त्यांचा विहित अर्ज (Annexure A मध्ये अर्जाचा नमुना) त्यांना पाठ्यक्रम बदल / संस्था बदलाद्वारे ज्या संस्थेत प्रवेश घ्यावयाचा आहे त्या संस्थेकडे दिनांक ०५ ऑगस्ट, २०२२ पर्यंत सादर करावा.**

उपरोक्त प्राप्त अर्जांची पडताळणी करण्यासाठी संदर्भीय परिपत्रक व पत्रामध्ये नमूद केलेल्या निर्देश व सूचनांचे तंतोतंत पालन करुन संस्थाबदलाबाबतचे अर्ज संदर्भ क्रमांक २ सोबत जोडलेल्या **Annexure B, Annexure C** सह या विभागीय कार्यालयास मूळ कागदपत्रांची पडताळणी केल्याच्या प्राचार्यांच्या प्रमाणपत्रासह हार्डकॉपी **दिनांक ०७.०८.२०२२ पर्यंत हस्तदेय सादर करावी.** विद्यार्थ्यांचा **Annexure A** मधील अर्ज व त्यासोबतची कागदपत्रांची विद्यार्थीनिहाय स्वतंत्र ई-फाईल (पीडीएफ) ई-मेलद्वारे या कार्यालयास ropune@dtemaharashtra.gov.in या ई-मेल आयडीवर सादर करावी. तसेच **Annexure B** ची **(Microsoft Excel Sheet)** मधील **सॉफ्ट कॉपी** संस्थेने या विभागीय कार्यालयास ई-मेलद्वारे पाठवावी.

पाठ्यक्रम / संस्थाबदल बाबतची कार्यवाहीची कालमर्यादा व कार्यवाही प्राधिकारी संदर्भ क्रमांक २ सोबतच्या **प्रपत्र अ** मध्ये स्पष्टपणे दिलेली असून त्याप्रमाणे सर्व संस्थांनी कालमर्यादेचे तंतोतंत पालन करावे.

सर्व संस्थांनी, संदर्भीय पत्रे त्यांचे संकेतस्थळावर प्रसिध्द करावे व सूचनाफलकावर प्रदर्शित करावीत जेणेकरुन इच्छूक पात्र विद्यार्थी पाठ्यक्रम / संस्थाबदलापासून वंचित राहणार नाहीत.

सोबत : संदर्भीय परिपत्रक व पत्राची प्रत.

(डॉ. द. व्यं. जाधव)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.

D:\Yogesh Kelkar\Admission 2022_23\Diploma\Institute Transfer\institute change circular 01.08.2022.docx